**महाराष्ट्र शासन**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

परिपत्रक क्र.नपप्रसं/मु.अ.-आस्था/सेनि/सुचना/२०२१/कक्ष-२ / 2681

शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला,

सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०३०.

दिनांक :- .०८.२०२१.

6 AUG 2021

**वाचा - १) संचालनालय पत्र क्र.नपप्रसं/परिपत्रक/सं-मु-आस्था/परिपत्रक/सेनि-वेतन/इतर लाभ/२०२०/कक्ष-२/१५०७, दि.३१.०७.२०२०.**

**२) संचालनालय परिपत्रक क्रम नपप्रसं/मु.अ.-आस्था/सेनि/सुचना/२०२०/कक्ष-२/२५३६, दि.१०.११.२०२०.**

## -: परिपत्रक :-

मुख्याधिकारी संवर्गातील आपल्या विभागांतर्गत नगरपरिषदा, नगरपंचायती, महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय कार्यालयात व अन्य कार्यालयात कार्यरत असताना सेवानिवृत्त झालेल्या मुख्याधिकारी यांना, सेवानिवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान, भविष्य निर्वाह निधी, अर्जित रजा रोखीकरण, गट विमा योजना अंतिम व निलंबन कालावधीतील निर्वाह भत्ता इ. लाभ अदा करणे आवश्यक आहेत. तथापि, सदरचे लाभ मुदतीत प्रदान न झाल्यामुळे व लाभ प्रदान करण्यास विलंब झाल्यामुळे संबंधित सेवानिवृत्ती मुख्याधिकारी हे मा.न्यायालयात प्रकरण दाखल केली जातात. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे सुचित करण्यात येत आहे.

१) संचालनालय पत्र क्र.डीएमई-१०९१/सीआर-२१६/६, दि.२५.०७.१९९१ व शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.डीएमए-१०९१/२७३३/नवि-१६, दि.१६.११.१९९१ ला अनुसरुन, मुख्याधिकारी संवर्ग अधिकाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे, प्रादेशिक उप संचालक, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय, नगरपरिषद प्रशासन कार्यालयांनी हाताळण्याबाबत, उपरोक्त वाचा क्र.१ येथील दि.३१.०७.२०२० च्या पत्रान्वये तसेच वाचा क्र.२ येथील संचालनालय परिपत्रक दि.१०.११.२०२० अन्वये पुन:श्च सुचित करण्यात आले आहे. त्याप्रमाणेच कार्यवाही करण्यात यावी.

२) मुख्याधिकारी संवर्ग अधिकारी यांना सेवानिवृत्तीनंतर सेवानिवृत्ती वेतन व तद्अनुषांगीक लाभ लवकरात लवकर मिळणे सोयीस्कर व्हावे यासाठी, प्रकरणी त्या वर्षी सेवानिवृत्त होणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांची यादी तयार करुन, वाचा क्र.२ येथील संचालनालय परिपत्रक दि.१०.११.२०२० नूसार पुर्तता करुन संबंधीत मुख्याधिकारी सेवानिवृत्त होण्याच्या ६ महिन्यापूर्वीच, संबंधीत विभागीय स्तरावरुन सेवानिवृत्तीच्या दिनांकास कार्यवाही पूर्ण झालेली असणे अत्यावश्यक आहे.

३) मुख्याधिकारी यांच्या सेवाविषयक बाबींवर वेळीच कार्यवाही होवून निपटारा होणे आवश्यक असल्याने, मुख्याधिकारी संवर्गातील विभागांतर्गत नगरपरिषदा, नगरपंचायती, महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय कार्यालयात व अन्य कार्यालयात कार्यरत अधिकारी यांची सेवापुस्तके नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालयाकडे ठेवण्यात यावीत. तसेच सेवानिवृत्तीनंतरचे लाभ संबंधित मुख्याधिकारी यांना प्रदान करण्याकरीता सेवापुस्तकातील अद्ययावत नोंदी घेऊन प्रमाणित करणे, व सेवापुस्तक वेतन पडताळणी पथकाकडून पडताळणी करुन घेतल्यानंतर सेवानिवृत्ती वेतन मंजरीबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव महालेखाकार कार्यालयाकडे सादर करावा.

४) मुख्याधिकारी यांच्या सेवानिवृत्तीनंतर सेवानिवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान मंजूर करण्यास प्रशासकीय कारणास्तव विलंब होत असल्यास, अथवा विभागीय चौकशी सुरु असल्यास, विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण होण्यास विलंब होत असल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम पुस्तिका १९८२ मधील नियम १२६ नूसार तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर करण्याची कार्यवाही करावी. तसेच विभागीय चौकशी प्रकरणी कार्यवाही पूर्ण होईपर्यंत तात्पपुरते निवृत्ती वेतन मंजूरीबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम पुस्तिका १९८२ मधील नियम १३० (ब) नूसार महालेखाकार कार्यालयाकडे मंजूरीस्तव सादर करावा.

५) मुख्याधिकारी संवर्ग अधिकारी यांना सेवानिवृत्तीनंतरचे सर्व देय लाभ विनाविलंब अदा होणेकरीता संबंधित शासन निर्णय व परिपत्रके आणि संचालनालयाचे आदेश व परिपत्रकांनूसार संबंधित सर्व प्रादेशिक उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय यांनी नियमोचित पध्दतीने विहीत मुदतीत प्राधान्याने कार्यवाही करावी.

मुख्याधिकारी संवर्गात कार्यरत असताना सेवानिवृत्त झालेल्या मुख्याधिकारी यांना, सेवानिवृत्ती वेतन व तद्अनुषंगीक लाभ अदा मुदतीत अदा करण्याकरीता उपरोक्तप्रमाणे नियमोचित कार्यवाही करण्यात यावी.

( डॉ.किरण कुलकर्णी-भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय-मुंबई

प्रत -

१) प्रादेशिक उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन- विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय (सर्व विभाग)

२) जिल्हा प्रशासन अधिकारी - नगरपरिषद प्रशासन (सर्व)

३) आयुक्त- महानगरपालिका (सर्व)

४) मुख्याधिकारी (सर्व)

सेवानिवृत्त मुख्याधिकारी - परिपत्रक-